# प्रेसनोट

दि.०१/१२/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | संतोष बाळासाहेब जाधव, वय–३९ वर्ष, पद–कनिष्ठ सहाय्यक, वर्ग–३, सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २३,०००/– रुपये तडजोडीअंती २२,५००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २२,५००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हया सन २०२१ पासुन जांभळी गावच्या सरपंच आहेत. त्यांचे गावासाठी सभा मंडपाकरीता आमदार निधीतून १५ लाख रुपयांचा निधी मंजूर झालेला आहे. सदर कामास नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी प्रशासकीय मान्यता देऊन सदर कामाची वर्क ऑर्डर देण्याकरीता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे सादर केलेले असून अद्याप वर्क ऑर्डर मिळालेली नाही. सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर येथील लिपीक जाधव यांनी सभा मंडपाचे कामाची वर्क ऑर्डर काढण्यासाठी मंजूर झालेल्या रकमेच्या दिड टक्के रक्कम २३,०००/– रुपये लाचेची मागणी करत असल्याची तक्रार आज दि.०१/१२/२०२३ रोजी प्राप्त झाली होती. त्यानुसार आज दि.०१/१२/२०२३ रोजी जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर येथे लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक संतोष बाळासाहेब जाधव यांनी तक्रारदार यांचे सोबत त्यांचे पती असतांना तक्रारदार यांचे पतीकडे जांभळी गावासाठी मंजूर झालेल्या सभा मंडपाच्या कामाची वर्क ऑर्डर देणेकरीता पंचासमक्ष २३,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २२,५००/– रुपये लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानुसार आज दि.०१/१२/२०२३ रोजी जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर येथे सापळा आयोजित केला असता यातील आरोपी लोकसेवक जाधव यांनी तक्रारदार यांचे पतीकडून पंचासमक्ष २२,५००/– रुपये लाच रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक जाधव यांचेविरुध्द कोतवाली पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in
ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७
व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर